रे.के.नं. ७८/२०१८
नि.क्र.६३/क

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.४ याची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | सनल राधाकृष्ण नायर |
| वय | - | ५५ वर्षे |
| व्यवसाय | - | नोकरी |
| राहणार | - | पवई मुंबई |

**<u>सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती पवार यांच्याद्वारे</u>**

१. मी घटनेच्या वेळी अधिक्षक सीआययु जवाहरलाल नेहरु कस्टम हाऊस म्हणून कार्यरत होतो. ते कार्यालय न्हावाशेवा येथे आहे. मी तेथे सन २०१६-२०१७ या कालावधी मध्ये होतो. आमचे उपआयुक्त श्री. गोखले यांचेकडे एक बील ऑफ एन्ट्री क्लीअरींग करीता १० तारखेला आले होते. ते कन्साईटमेंट खजूरांचे होते. ते कन्साईटमेंट जेकेसी जनरल ट्रेडींग या कंपनीचे होते. ओल्या खजुरासाठी प्लान्ट कॉरनटाईन सर्टीफिकेटची आवश्यकता असते. श्री. गोखले यांचेकडे आलेले त्या सर्टीफिकेट वर असलेली सीरीज वेगळी होती व त्यावर श्री.चंद्रा यांची सही होती. त्या प्रमाणपत्राचा क्र. आयआरओ ६१९९३२ असा होता. श्री गोखले यांनी त्वरीत प्लान्ट कॉरनटाईन सर्टीफिकेट इश्यु करणाऱ्या अधिकाऱ्यांना फोन केला. तेव्हा ते प्रमाणपत्र बोगस असल्याचे त्यांना समजले. त्यामुळे ते प्रकरण सीआययु कडे दि. २१/११/२०१६ रोजी तपास करणेसाठी सोपविण्यात आले. मी तपासा अंतर्गत गिरीश ठाकूर कर्मचारी एमडीएस लॉजिस्टीक यांचा जबाब नोंदविला. तसेच त्याच दिवशी म्हणजे दि. २४/११/२०१६ रोजी मी त्या कंपनीच्या डायरेक्टरचा सुद्धा जबाब नोंदविला. गिरीश ठाकूर याने सांगितले की, त्याचा वरिष्ठ श्री. कोठारी याला ते कन्साईटमेंट क्लीअर करण्यासाठी फार दबाव होता. त्यामुळे त्याला आठविले की,

त्याचेकडे एक कोरे प्रमाणपत्र पडलेले आहे. त्यामुळे त्यांनी कोठे तरी जाऊन ५० रूपये देऊन त्यातील मजकूर टाईप करुन घेतला व श्री. चंद्रा यांची सही गिरीश ठाकूर याने स्वत: केली. त्याला ते प्रमाणपत्र कोठून मिळाले याची विचारणा केली असता, त्याने सांगितले की, त्याचा मित्र आशिष ठक्कर त्याच कंपनीत कामाला असून त्याला बरेच कालावधी आधी चुकून एक कोरे प्रमाणपत्र मिळाले होते व ते त्याने त्याला दिले व त्याच कोऱ्या प्रमाणपत्राचा त्याने वापर केला. मी पुढील तपासात आशिष ठक्कर याचा सुद्धा जबाब नोंदविला. त्याने सुद्धा कबुल केले की, एक कोरे प्रमाणपत्र त्याने ऑफिसमध्ये आणून ठेवले होते. त्या प्रमाणपत्राचा वापर गिरीश ठाकूर ने केल्याचे त्याला माहित नाही. मी गिरीश ठाकूर व आशिष ठक्कर यांना पाहिल्यास ओळखू शकतो. ते आजरोजी न्यायालयात हजर आहेत.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे वकील श्री. योगेश गांगण यांच्याद्वारे...</u>**

२. मी एसआरएन क्र. २६८/२०१६ हे समन्स काढले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी सदर प्रकरणाचा तपास अधिकारी होतो. हे म्हणणे खरे आहे की, तो तपास कस्टम कायद्या अंतर्गत होता. हे म्हणणे खरे आहे की, आयात किंवा निर्यात करण्यासाठी एखादा बनावट दस्त सादर केल्यास कलम १३२ कस्टम कायद्या अंतर्गत गुन्हा होतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे त्या गुन्हयाचे प्रकरण दाखल करता येते. हे म्हणणे खरे आहे की, तपास केल्यावर कस्टम विभागाच्या आयुक्तास अहवाल सादर करावा लागतो. हे म्हणणे खरे आहे की, कस्टम विभागाच्या तपासा अंतर्गत कारणे दाखवा नोटीस काढल्या जातात. हे म्हणणे खरे आहे की, जे व्यक्ती गुन्हयात जबाबदार आढळून आले त्यांचे वर दंड आकारला जातो. हे मला आठवत नाही की, मी कस्टम विभागाच्या आयुक्तांकडे अहवाल सादर केला किंवा नाही. मी कस्टम कायद्याअंतर्गत सदर प्रकरणात जबाब नोंदविल्यावर माझी बदली झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, जबाब नोंद केल्यावर जेकेसी जनरल ट्रेडिंग कंपनी याला लाभ होणार होता, असे जबाबावरुन आढळून आले. मी मिथून पोतदार याला जबाब नोंदविण्यासाठी बोलाविले

होते. हे म्हणणे खरे आहे की, ते एमडीएस लॉजिस्टीक चे डायरेक्टर आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्यांच्या जबाबाद्वारे त्यांच्या कंपनीत ४० कामगार कार्यरत असल्याचे समजले. हे मला माहित नाही की, ते सर्व ४० कर्मचारी कस्टम कार्ड होल्डर होते. हे म्हणणे खरे आहे की, मी जबाब नोंदविणे व्यतिरिक्त सदर वादातील प्रमाणपत्र कोणी, केव्हा व कोठे तयार केले, याची वैयक्तीक माहिती मला नाही. माझा पोलीसांनी दि. ०९/०२/२०१८ रोजी जबाब नोंदविला होता. हे म्हणणे खरे आहे की, अंदाजे एक वर्ष चार महिन्यांनी नोंदविला. हे म्हणणे खरे आहे की, मी कस्टम अधिकारी असल्याने प्रथम खबर नोंदविण्याचे मला सुद्धा अधिकार आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, गिरीश ठाकूर याने कोऱ्या प्रमाणपत्रावर मजकूर लिहून घेऊन श्री. चंद्रा यांची खोटी सही केल्याचे माझे तपासात आढळून आल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी तपासा अंतर्गत गिरीश ठाकूर याचा जबाब नोंदविल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरकारी कर्मचारी असल्याने सरकारला मदत होण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

उरण,

(एस.पी. वानखडे )

दिनांक – २५/११/२०२५

न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग,न्यायालय क्र.२ उरण